नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

अमरावती कृषी हवामान सल्ला मंगळवार दिनांक – ०७.०१.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०८ ते १२ जानेवारी २०२०)				
दिनांक	०८/२०२०	०९/२०२०	१०/२०२०	११/२०२०	१२/२०२०
पाऊस (मिमी)	१	१	०	०	०
कमाल तापमान (अं.से.)	२६	२५	२५	२४	२५
किमान तापमान (अं.से.)	१२	१४	११	१२	१२
ढग स्थिती (आकाश)	पूर्णतःढगाळ	पूर्णतःढगाळ	अंशतःढगाळ	अंशतःढगाळ	स्वच्छ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	८०	८५	७८	७५	७४
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६०	५५	५५	५२	५०
वा-याचा वेग (किमी / तास)	२	२	२	२	२
वा-याची दिशा	१२६	२२६	३४	७७	११७

हवामानाचा इशारा	सध्यस्थितीत जिल्यात दिनांक ०७-०९ जानेवारी दरम्यान तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचाच्या पावसाची शक्यता आहे तसेच १०-११ जानेवारी रोजी हवामान कोरडे राहील. त्या मुळे पिकावर फवारणीकरण्या अगोदर स्तानिक वातावरण पाहूनच फवारणी करावी. वातावरणातील बदल पाहता फळबगेंची योग्य ती काळजी घ्यावी.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कपाशी	बोंड	येत्या दोन ते तीन दिवसात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचाच्या पावसाची शक्यता आहे त्यामुळे कापूस फुटला असेल तर स्वच्छ वेचावा व सुरक्षित कोरड्या ठिकाणी ठेवावा. कपाशी पिकाचे फरदड घेतल्यास शेंदरी बोंडअळी सोबत इतर अळयांना खाद्य मिळाल्यामुळे त्याचा प्रधुर्भाव जास्त राहतो व त्यांचा परिणाम पुढील हंगामातील पिकावर लवकर होता, त्यामुळे फरदड घेवु नये.
तूर	दाना भरणे/पक्वता	तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या (हेलीकोवरपा) अळीच्या व्यवस्थापनासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. तुरीवरील शेंगा पोखरणाऱ्या (हेलीकोवरपा) अळीच्या व्यवस्थापनासाठी किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी गाठल्यानंतर (१० ते २० अळया / १० झाडे) इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी. ३ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
करडई	वाढ/फुलोरा	करडई पिकामध्ये रस शोषण करणाऱ्या मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० % प्रवाहि १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
हरभरा	वाढ	येत्या दोन ते तीन दिवसात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचाच्या पावसाची शक्यता आहे त्यामुळे सध्यस्थितीत पिकाला ओलीत करु नये, पुढे जमिनीतील ओलावा पाहून निर्णय घ्यावा. अळीच्या व्यवस्थापनासाठी ५ % निंबोळी अर्काची फवारणी करावी तसेच मर रोगाचा शेतात प्रादुर्भाव दिसताच रोगट झाडे उपटून नष्ट करावीत. ट्रायकोडर्मा शेणखतात मिसळून द्यावा. वेळेवर पेरणी केलेले पिक सुमारे ४५ ते ६० दिवस तणमुक्त असावे. गरज पडल्यास एक निंदन करून तण वेवास्थापन करावे. बागायती हरभरा पिकावरील ओली मुळकुज व कॉलररॉट दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावा. हरभरा पिकात एकरी ८-१० पक्षी थांबे लावल्यास अळयांची संख्या कमी होण्यास मदत होते.

गहू	वाढ	गहु पिकास मध्ये मावा किडीच्या या नियंत्रणासाठी एकरी ५ ते १० पिवळे चिकट सापळे लावावेत. पिकावरील माव्याचे नियंत्रणासाठी २५ डब्ल्यु जी थायोमेथॉक्झान ५० ग्रॅम किंवा डायमेथोएट ३० ईसी १० मिली १० लिटर पाण्यातून फवारावे.
रब्बी ज्वारी व मक्का	वाढ	रब्बी ज्वारी पिकात मावा व तुडतुडे यांच्या वेवास्थापनेसाठी पिकाच्या नाजूक अवस्थेत पाण्याचा ताण पडू देयू नये.
फळझाडे	वाढ	येत्या दोन ते तीन दिवसात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचाच्या पावसाची शक्यता आहे त्यामुळे वातावरणातील बदल पाहता फळबगेंची योग्य ती काळजी घ्यावी. मागील दोन दिवसात काही ठिकाणी गारांसह पाऊस पडला आहे अशा ठिकाणी गारपिटीमुळे मोडलेल्या फांद्या आरीच्या साह्याने कापाव्यात व कापलेल्या भागावर बोर्डो पेस्ट (१:१:१०) लावावी. गारपीटग्रस्त झाडांच्या बुन्धास १ मिटर उंची पर्यंत पेस्ट लावावी. सततच्या ढगाळ वातावरणामुळे व पावसामुळे मृगबहर असलेल्या बगीच्यामध्ये फळावर तपकिरी कुज (ब्राऊन राट) या रोगाचे संक्रमण होऊ शकते, त्याकरिता संपूर्ण झाडावर फोसेटील एल २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सीक्लोरीईड ५० टक्के डब्लू पी ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यासोबत फवारावे. तसेच कागदी लिंबू वरील खे्र्या रोगाचे लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोरीईड ५० टक्के डब्लू पी ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यासोबत फवारावे. डाळिंब पिकावरील तेल्या रोगाच्या नियत्रंणाकरिता कॉपर हायड्रोक्साआईड २५ ग्रॅम + स्त्रेप्तोमायसीन सल्फेट ५ ग्रॅम किवां ब्रोनोपोल* ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी फवारणी करतांना स्टीकरचा वापर करावा. तीव्रतेनुसार १५ दिवसांनी पुन्हा फवारणी करावी. मिरची पिकावरील शेंडेमर व फळसड रोगाच्या नियत्रंणाकरिता डायफेनकॉनाझोल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किवां अझोक्सोस्त्रोबीन २३% एससी १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
बटाटा	कंद निर्मिती	रब्बी हंगामातील बटाटा वरील मावा व तुडतुडे यांच्या नियत्रंणासाठी फिप्रोनील ५ टक्के एस. सी १५ मि.ली १० लिटर पाण्यासोबत फवारावे. करपा रोगाचे लक्षणे दिसताच कॉपर ऑक्सीक्लोरीईड ५० टक्के डब्लू पी ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यासोबत फवारावे.
कांदा	लागवड	कांदा पिकाची ६-८ आठवडयाचे रोपे सपाट वाफ्या मध्ये १० * १० सें. मी. अंतरावर जानेवारीच्या पहिल्या पंधरवड्यात लागवड करावी.
पशु व पक्षी	--	जिल्ह्यात किमान तापमानात घट होत असल्यामुळे कुकुटपालन शेडमध्ये दोन्ही बाजूच्या जाळयांना पडदे किंवा बारदाना लावावा तसेच शेडमध्ये रात्रीच्या वेळी विधूत बल्ब लावून शेडमध्ये तापमान ३० अं.सें पर्यंत नियंत्रित करावे. शरीरातील तापमान टिकविण्याकरिता उर्जायुक्त खाद्यपदार्थ उदा.स्निग्ध पदार्थ, प्रथिने यांचे खाद्यातील प्रमाण वाढवावे. हवानात आचक बदल जनावरांना चा-यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार एकदल वर्गीय (मका, ओट) व व्दिदल वर्गीय (लसुन, बरसीम) घासाची पेरणी करावी

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.